MHLA090011852017

| | |
|---|---|
| दाखल दिनांक | ३१/१०/२०१७ |
| नोंद दिनांक | ३१/१०/२०१७ |
| न्यायनिर्णय दिनांक | २७/०७/२०२६ |
| कालावधी | **०८व. ०८म. २७दि.** |

**न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, उदगीर, जि.लातूर यांचे न्यायालयात**

**(श्री.व्ही.आर.घराळ यांचेसमोर)**

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र.८६३/१०१७**

**न्यायनिर्णय निशाणी .क्र.९८**

बसवंत संग्रामप्पा पाटील
वय वर्षे– ५८ वर्षे, व्यवसाय– पेन्शनर
रा.बी.ए.एम.एस.कॉलेज जवळ, उदगीर, ता.उदगीर, ता.लातूर.

.. **फिर्यादी**

***विरुद्ध***

सिध्देश्वर पि.गुंडेराव बंडरे
वय वर्षे– ३० वर्षे, व्यवसाय– व्यापार
रा.सुमठाणा, ता.उदगीर, जि.लातूर.

.. **आरोपी**

**फिर्यादः एन.आय.अॅक्ट, कलम १३८ प्रमाणे.**

फिर्यादीतर्फे विधीज्ञ – श्री.एन.एन.पटेल
आरोपीतर्फे विधीज्ञ – श्री.डी.एम.पाटील

**:: न्यायनिर्णय ::**

**(घोषित केला दि.२७/०७/२०२६)**

फिर्यादी यांनी सदरची केस आरोपी यांच्या विरुद्ध कलम १३८ एन.आय अॅक्ट प्रमाणे दाखल केली आहे.

२. फिर्यादीची केस थोडक्यात पुढील प्रमाणेः फिर्यादी यांच्या म्हणण्याप्रमाणे आरोपी हा बऱ्याच काळापासून उदगीर येथे वाहने खरेदीविक्रीचा व्यवसाय करतो तर बाबा रफियोद्दीन खादरी हे फिर्यादी व आरोपीचे मित्र असल्याने त्यांच्या दुकानावर ते बसत. आरोपी मुळचा सुमठाणा येथील रहिवासी असून सन २०१६ साली घर बांधताना आर्थिक अडचण आल्याने अडीच लाखाची त्याला अडचण होती. त्याप्रमाणे मार्च, २०१७ मध्ये त्याने फिर्यादीकडे मागणी केली. दि.१२/०३/२०१७ रोजी फिर्यादी बाबा रफियोद्दीन खादरी व अब्दुल जब्बार खादर यांच्या समक्ष आरोपीला अडीच लाख हातबदल रक्कम चार महिन्याच्या परत फेडीच्या बोलीवर दिली. दि.१२/०८/२०१७ रोजी फिर्यादीने आरोपीकडे पैशांची मागणी केली असता आरोपीने पैसे देण्यास असमर्थता दाखवली. मग त्याने दि.२१/०८/२०१७ रोजी देय असणारा स्टेट बँक ऑफ हैद्राबाद, उदगीर शाखेचा रक्कम रु.२,५०,०००/- चा चेक क्र.०३०८४३ फिर्यादीला दिला. दिलेल्या हमीप्रमाणे आरोपीने धनादेश दि.२१/०८/२०१७ रोजी वटण्यासाठी भरला असता खात्यावर पुरेशा रक्कमेअभावी चेक न वटता परत आला. त्यानंतर फिर्यादीने वकीलांमार्फत दि.२९/०८/२०१७ राजी नोटीस पाठवली. दि.१४/०९/२०१७ ला ती आरोपीला मिळाली. नोटीस मिळून सुद्धा चेकची

रक्कम न दिल्याने फिर्यादीने आरोपीविरुद्ध सदरची केस दाखल केलेली आहे.

३. आरोपीला फिर्याद व त्यासोबत कागदपत्रांच्या नक्कला पुरवण्यात आल्या. माझे भूतपूर्व न्यायाधीश यांनी आरोपीच्या विरुद्ध नि.क्र.१८ वर प्ली नोंदवली. आरोपी याने गुन्हा कबूल नसल्याचे सांगून त्याने बाबा रफियोद्दीन खादरी यांच्याशी असणाऱ्या व्यवहारापोटी दिलेल्या कोऱ्या चेकचा गैरवापर करून केस दाखल केल्याचा बचाव आहे.

४. फिर्यादी यांचे विद्वान वकील श्री.एन.एन.पटेल यांनी युक्तिवाद सादर केला की, फिर्यादीने सक्षीदारामसक्ष आरोपीला पैसे दिले असून आरोपीने दिलेला चेक हा वटला नसल्याने आरोपीला शिक्षा करण्यात यावी. आरोपी यांचे विद्वान वकील श्री.डी.एम.पाटील यांनी युक्तिवाद सादर केला की, बाबा रफियोद्दीन खादरी यांचा बांधकाम साहित्य विक्रीचा व्यवसाय असून आरोपी त्यांच्याकडून माल विकत घ्यायचा व त्या व्यवहारापोटी बाबा रफियोद्दीन खादरी यांच्या कडे जो कोरा चेक ठेवला त्याचा गैरवापर करून सदरची केस दाखल केलेली आहे. त्यामुळे त्यांनी आरोपीला निर्दोष म्हणून सोडण्याविषयी विनंती केली.

५. सदर केसच्या कामी आरोपी यांच्या विरुद्ध असणारा पुरावा

त्यांना वाचून दाखवला, फौजदारी प्रक्रिया संहिता, कलम ३१३ प्रमाणे त्याचा जबाब नोंदवण्यात आला. त्यानंतर बचाव पक्षाचा पुरावा नोंदवून घेतला. फिर्यादी व आरोपी यांचे विद्वान वकीलांचा युक्तिवाद ऐकल्यावर पुढीलप्रमाणे गुण या केसच्या कामी काढण्यात येतात.

| **अ.क्र.** | **गुण** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १ | आरोपी यांनी कायदेशीर देण्यापोटी रु.२,५०,०००/- रक्कमेचा चेक क्र.०३०८४३ दि.२१/०८/२०१७ रोजीचा चेक फिर्यादीला दिला होता ही बाब फिर्यादी सिद्ध करतो काय ? | नाही. |
| २ | दि.२९/०८/२०१७ रोजीची नोटीस दि.१४/०९/२०१७ रोजी प्राप्त होऊन सुद्धा चेकची रक्कम आरोपीने फिर्यादीला आणून न दिल्याने आरोपी दोषी आहे ही बाब फिर्यादी सिद्ध करतो काय ? | नाही. |
| ३ | काय हुकूम ? | अंतिम हुकूमाप्रमाणे |

## कारणमिमांसा

६. सदर केसच्या कामी फिर्यादी याने आपला पुरावा नि.क्र.०८ वर नोंदवलेला आहे. आरोपीने त्याला दिलेला चेक नि.क्र.७ वर दाखल आहे. नि.१९ वर चेक परत आला, तो परताव्याचा मेमो आहे. वकीलामार्फत पाठवलेल्या नोटीसची स्थळप्रत नि.क्र.२० वर आहे. पोस्टाची पावती

नि.क्र.२१ वर आहे. नि.क्र.२२ वर पोहोचपावती आहे. फिर्यादी यांनी बाबा रफियोद्दीन खादरी यांना नि.क्र.३६ वर तपासले आहे. सदर केसच्या कामी आरोपी याने आपली साक्ष बचाव पक्षाचा साक्षीदार क्र.१ म्हणून नि.क्र.७५ वर नोंदवलेली आहे. अशाप्रकारे फिर्यादीने व बचाव पक्षाने आपापला पुरावा या केसच्या कामी दाखल केलेला आहे.

७. **गुण क्र.१ः** फिर्यादीच्या म्हणण्याप्रमाणे आरोपीला अडीच लाखाची गरज होती म्हणून मार्च, २०१७ कडे त्यांनी फिर्यादीकडे मागणी केली. फिर्यादी यांचे विद्वान वकील श्री.एन.एन.पटेल यांनी युक्तिवाद सादर केला की, साक्षीदारांसमक्ष ती रक्कम आरोपीला देण्यात आली. त्यानंतर आरोपीकडे ठरल्याप्रमाणे मागणी केली असता त्याने चेक दिला, तो वटण्यासाठी भरला असता तो न वटता परत आला. फिर्यादी यांच्या विद्वान वकीलांनी युक्तिवाद सादर केला की, बचाव पक्षाने सादर केलेला बचाव हा कुचकामी आहे. आरोपीकडे स्वतःचे वाहन नसून तो वाळूचा व्यवसाय करत होता हे दाखवायला रॉयल्टीची कोणतीही पावती दाखल केलेली नाही. त्यामुळे आरोपी याने फिर्यादीशी झालेला व्यवहार नाकारण्यासाठी खोटा बचाव सादर केल्याने त्याला शिक्षा करण्याविषयी विनंती केली. आरोपीचे विद्वान वकील यांनी युक्तिवाद सादर केला की, आरोपीचा बाबा रफियोद्दीन खादरी यांच्याशी

व्यवहार होता. आरोपी याचा पूर्वी वाहन विक्रीचा व्यवसाय होता व तो आता वाहन चालक म्हणून काम करत असून त्याचा उल्लेख फिर्यादीने कोठेही केलेला नाही. बचाव पक्षाच्या म्हणण्याप्रमणे बाबा रफियोद्दीन खादरी यांच्याशी असणाऱ्या व्यवहारापोटी कोरा चेक देण्यात आलेला होता. तो त्याच्याकडे राहिल्याचा गैरफायदा घेऊन त्याने सदर केसची रचना फिर्यादीला हाताशी धरून केलेली आहे. बचाव पक्षाच्या म्हणण्याप्रमाणे त्याने कोणतीही रक्कम फिर्यादीकडून कधीही घेतलेली नव्हती. त्यामुळे त्याला निर्दोष सोडण्याविषयी त्यांनी विनंती केली.

८. सदर केसच्या कामी फिर्यादीच्या म्हणण्याप्रमाणे आरोपीने सन २०१६ साली घराचे बांधकाम केल्याचे म्हणले आहे. तर केसच्या कामी बचाव पक्षाने पण आपली साक्ष सादर केली असून फिर्यादी याने वडीलांनी पूर्वी २० वर्षापूर्वी घर बांधल्याचे नमूद केले आहे. फिर्यादीचे घराचे बांधकाम सन २०१६ साली चालू होते किंवा पूर्ण झाले याबाबत कोणताही तोंडी किंवा कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नही. फिर्यादीच्या म्हणण्याप्रमाणे अडीच लाख रुपये रक्कम त्याने आरोपीला दिलेली होती, तो व्यवहार कोणत्याही चेकद्वारे करण्यात आलेला नाही. त्यामुळे पैश्यांचा स्त्रोत बेकायदेशीर असल्याचा तर्क प्राप्त होतो. याशिवाय वादातील व्यवहार पाहिला तर रक्कम रुपये अडीच लाख दिल्यावर

परत कराण्याची हमी आरोपीने दिली होती याबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा फिर्यादीने दाखल केलेला नाही. रु.१००/- वरील व्यवहार असेल तर तो लेखी असणे कायद्याने बंधनकारक आहे. फिर्यादीने कोणतीही लेखी पावती, कागदपत्र किंवा बॉन्ड दाखल केलेला नाही, ज्याद्वारे आरोपीला त्यांनी अडीच लाख रुपये दि.१२/०३/२०१७ ला अदा केले होते ही गोष्ट स्पष्ट करेल. यापुढची बाब म्हणजे स्वतः फिर्यादी कबूल करतो की, दि.१२/०८/२०१७ रोजी फिर्यादीपाशी विचारणा केली असता आरोपीने पैसे देण्यास असमर्थता दाखवल्याचे तो मान्य व कबूल करतो. यावरून फिर्यादीला आरोपीकडे त्या तारखेला कोणतेही पैसे शिल्लक नव्हते ही बाब त्याला माहिती असताना त्याने दि.२१/०८/२०१७ रोजीचा चेक स्विकारण्याचे कोणतेही कारण फिर्यादी स्पष्ट करू शकलेले नाही. फिर्यादीच्या म्हणण्याप्रमाणे आरोपीने त्याला दि.१२/०८/२०१७ ला तशी हमी दिली होती तर तशी हमी दर्शवणारी किंवा अन्न इतर कोणती पावती केसच्या कामी दाखल करण्यात आलेली नाही.

९. या केसच्या कामी फिर्यादी यांनी बाबा रफियोद्दीन खादरी यांचा पुरावा नि.क्र.३६ वर घेतलेला आहे. नि.क.३६ वरील पुरावा पाहिला तर सन २०१६ साली आरोपींने घर बांधल्याचे व त्याबाबत त्याला कर्ज झाल्याबाबत त्यांनी पण दुजोरा दिलेला आहे. पंरतु फिर्यादी यांचा पुरावा जेवढा कुचकामी

आहे त्याचप्रमाणे बाबा रफियोद्दीन खादरी यांचा पण पुरावा तथ्यहीन असल्याचे दिसनू येते. एकंदरीत परिस्थिती पाहाता बाबा रफियोद्दीन खादरी यांच्या पुराव्यावरून आरोपी यांचा आर्थिक व्यवहार त्यांच्यासोबत होता. तो कायदेशीर नसला तरी बेकादेशीररित्या चोरट्या वाळूचा व्यवहार अस्तित्वात असल्याचा तर्क प्राप्त होतो. तसेच आरोपी हा इतर साहित्य बाबा रफियोद्दीन खादरी यांच्याकूडून घेऊन त्याच्या परिचयातील लोकांना पुरवठा करत असल्याचे स्पष्ट होते.

१०. फिर्यादी यांचा जर पुरावा पाहिला तर त्यांचा वैयक्तिकरित्या आरोपी याच्याशी मित्रत्वाचे किंवा अडीच लाख रुपये देण्याचे संबंध होते असा कोणताही पुरावा उपलब्ध नाही. फिर्यादी याने संबंधीत व्यवहार सावकारीबाबतचा असल्याबात कोणताही पुरावा या कामी दाखल केलेला नाही अडीच लाख रुपये रक्कम मोठी असल्याबाबत ती देतेघेतेवेळी कोणतीही पावती करण्यात आलेली नाही. त्यामुळे चेक क्र.०३०८४३ हा कायदेशीर देण्यापोटी फिर्यादीला दिला होता असे म्हणता येऊ शकत नाही. त्यामुळे गुण क्र.१ चे उत्तर नाही म्हणून देण्यात येते.

११. **गुण क्र.२ः** सदर केसच्या कामी आरोपी याला

दि.१४/०९/२०१७ रोजी नोटीस बजावल्याचे फिर्यादीकडून सांगण्यात आले. फिर्यादी यांच्या विद्वान वकीलांच्या म्हणण्याप्रमाणे चेक कोणत्या तारखेला वटण्यासाठी भरला ती तारीख चेकवर नमूद नाही किंवा चेक ज्या चलनाद्वारे भरण्यात आला त्या चलनाची काऊंटर फाईल दाखल करण्यात आलेली नाही. तर चेक परताव्याचा मेमो यावर कोणतीही तारीख नमूद नाही. आरोपीच्या वतीने म्हणणे मांडण्यात आले की, फिर्यादीने बँक अधिकारी व इतर लोकांना हाताशी धरून संबंधीत कागदपत्र रंगवल्याचे म्हणलेले आहे. या केसच्या कामी प्राप्त असणारी नोटीस बजावलेली पोहोचपावती नि.क्र.२२ जर पाहिली तर त्यावर महादेवी खुशाल बंडरे यांची सही असल्याचे दिसून येते. त्यामुळे ती नोटीस आरोपी यांच्या राहात्या पत्त्यावर बजावली गेली असा कोणताही तर्क त्याद्वारे प्राप्त होत नाही. फिर्यादीने दिलेली नोटीस आरोपीला प्राप्त झालेली आहे हे प्राप्त असणाऱ्या पुराव्यावरून सिद्ध होत नसल्याने आरोपीने नोटीसपासून १५ दिवसांच्या आत चेकची रक्कम फिर्यादीला आणून देणे बंधनकारक होते असे म्हणता येऊ शकत नाही. त्यामुळे गुण क्र.२ चे उत्तर नाही म्हणून देण्यात येते.

१२. या केसच्या कामी फिर्यादी यांनी आरोपी याला अडीच लाख रुपये हातबदल म्हणून दिले असल्याने त्याच्या परतफेडी पोटी दिलेला चेक न

वटल्याने सदरची केस दाखल केली असल्याचे म्हणले आहे. फिर्यादीने अडीच लाख रुपये दिले होते व ते आरोपीला प्राप्त होते हे दाखवणारा कोणताही कागदोपत्री पुरावा उपलब्ध नाही. आरोपीने सादर केलेल्या संभाव्य पुराव्यावरून बाबा रफियोद्दीन खादरी यांच्याशी पूर्वी आर्थिक व्यवहार असल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे पुढील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येतात.

## आदेश

१. आरोपी यांना फौजदारी प्रक्रिया संहिता, कलम २५५(१) अन्वये कलम १३८ एन. आय. अॅक्ट च्या गुन्ह्यातून निर्दोषमुक्त करण्यात येते.

२. आरोपी यांचा जामीनकदबा रद्द करण्यात येतो.

३. आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता, कलम ४३७–अ प्रमाणे वैयक्तिक जातमुचलका व जामीनकदबा रक्कम रु.५,०००/– चा दाखल करावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घाषीत करण्यात आला.)

Digitally signed by VIJAY RAMCHANDRA GHARAL
Date: 2026.07.27 17:38:51 +0530

**उदगीर.** **(श्री.व्ही.आर.घराळ)**

**दि.२७/०७/२०२६** **न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, उदगीर.**

I affirm that, the contents of this P.D.F. file are same, word to word, as per the original Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | ***Miss L. S. Kendre*** |
| Court | : | ***Shri. V. R. Gharal***<br>Jt.Civil Judge Jr.Dn. and<br>Judicial Magistrate F.C., Udgir. |
| Date | : | 27/07/2026 |
| Judgment signed by the Presiding officer on | : | 27/07/2026 |
| Judgment uploaded on | : | 27/07/2026 |